## प्रकरण पहिले

## शेतकरी सहकारी संघाची विकासातील भूमिका

### १.१ प्रस्तावना :

एम्.फिल्.साठी शोधनिबंध तयार करण्यासाठी अभ्यास विषय म्हणून कोल्हापूर जिल्हातील शेतकरी सहकारी संघाच्या ' दाणेदार मिश्र खत कारखाना मर्यादित, रूकडी ' या शाखेचा अभ्यास हाती घेतला. त्यासाठी रूकडी येथील खत कारखान्याची निवड केली आहे. महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीत अग्रेसर असलेला कोल्हापूर जिल्हा आणि त्या जिल्हातील शेतकरी सहकारी संघाशी निगडित असलेली सहकारी चळवळ हाती घेतली आहे. या प्रकरणात प्रामुख्याने अभ्यास करून त्या चळवळीने सहकारी विकासात घातलेली भर अभ्यासणे जरूरीचे ठरते. त्याच बरोबर अभ्यास विषय म्हणून निवडलेल्या दाणेदार मिश्र खत कारखाना मर्यादित, रूकडी या शाखेचा अभ्यास करणे वरील संदर्भात क्रमप्राप्त ठरते.

### १.२ कोल्हापूर जिल्हातील सहकारी चळवळीचा उदय व विकास :

भारताच्या सहकारी चळवळीत कोल्हापूर जिल्हास फार महत्वाचे स्थान आहे याला इतिहासाची साक्ष आहे. कोल्हापूर जिल्हा हा सहकारी चळवळीचे माहेरघर आहे. त्याहीपेक्षा भारतातील सहकारी चळवळीचा प्रारंभ कोल्हापूर जिल्हातूनच झाला असे म्हटल्यास अतिशयोक्ती न ठरता ती गोष्ट वस्तुस्थितीची निदर्शकच ठरेल कारण कोल्हापूर जिल्हाबाहेर कोठेही परिचित नसलेली व बँकेची एक छोटीशी आवृत्तीच ठरेल अशा भिशी पध्दतीचा वापर कोल्हापूर जिल्हात शंभर वर्षांपेक्षा अधिक काळापूर्वी-पासूनच चालू आहे.

कै. नामदार भास्करराव जाधव यांची सहकारी चळवळीविषयी अतिशय भक्ती होती. १९१३ साली ते कोल्हापूर नगरपालिकेचे प्रशासक होते. नगरपालिकेत काम करीत असलेले भंगी, झाडूवाले आदी कनिष्ठ दर्जाच्या नोकरांची दैन्यावस्था पाहून त्यांना कीव आली व त्यांना अशा हलाखीच्या स्थितीतून आणि पठाणी सावकारीच्या मारमिठीतून सोडविण्याविषयी तळमळ लागली. त्यांनी ही गोष्ट कै. राजर्षि शाहू महाराज यांचे निदर्शनास आणली. कोल्हापूर हे त्यावेळी स्वतंत्र संस्थान असल्याने त्यांचे कायदेही स्वतंत्र असत परंतु हे कायदे मुख्यत: मुंबई प्रांताच्या कायद्याच्या मसुद्यानुसार असत. सहकारी मंडळाबाबतचा १९१२ सालचा कायदा पास झाल्यावर तो कायदा १९१३ साली छत्रपतींनी कोल्हापूरला लागू केला व करवीर पेटयाचे मामलेदार यांची सहकारी सोसायटयांचे रजिस्ट्रार म्हणून नेमणूक करण्यात आली. १९२८ साली हे सहकारी खाते स्वतंत्र केले.

कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी
चळवळीची आजची स्थिती -

कोल्हापूर संस्थानात सन १९२७ मध्ये ३२ सहकारी सोसायटया होत्या त्यानंतर सन १९४१ अखेर सहकारी संस्थांची संख्या ३७५ झाली. महाराष्ट्रामध्ये सर्वप्रकारच्या सहकारी संस्थांची संख्या १९८९ अखेर ९२,५०७ इतकी असून कोल्हापूर जिल्ह्यामध्ये आज अखेर म्हणजे ३०-६-१९८९ अखेर सहकारी संस्थांची संख्या ४,६८३ इतकी आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील सर्वप्रकारच्या सहकारी संस्थांची आकडेवारी पुढील तक्ता क्र. १ मध्ये दिली आहे.

## तक्ता क्रमांक १.१

### कोल्हापूर जिल्हातील सहकारी संस्थांची एकत्रित आकडेवारी

| अनु. | सहकारी संस्थेचा प्रकार | १९७८ | १९८१ | १९८५ | १९८९ |
|---|---|---|---|---|---|
| १. | मध्यवर्ती बँका | १ | १ | १ | १ |
| २. | शेतकी सेवा संस्था | ८६३ | ८४६ | ८६२ | ८८५ |
| ३. | अर्बन बँका | ३९ | ४० | ४० | ४० |
| ४. | धान्य सहकारी बँक | ५३ | ५२ | ३८ | ३६ |
| ५. | पगारदार सहकारी बँक | १२९ | १३७ | १६७ | १९१ |
| ६. | नागरी पत व मिश्री संस्था | १५६ | २२९ | ३५५ | ७०१ |
| ७. | मार्केटिंग सहकारी संस्था | १८ | १९ | २० | २२ |
| ८. | शेतीमाल प्रक्रिया संस्था | १६ | १६ | १४ | १६ |
| ९. | पाणीपुरवठा संस्था | २१४ | ३१३ | ३७७ | ४४९ |
| १०. | शेती संस्था | २६ | २५ | २० | १६ |
| ११. | दुग्ध पुरवठा संस्था | ६११ | ७७९ | १०९७ | ११८४ |
| १२. | ग्राहक संस्था | ५८ | ६१ | १०३ | १३४ |
| १३. | घर बांधणी संस्था | २६६ | ३१६ | ४१२ | ५०४ |
| १४. | मजूर संस्था | ७५ | ९० | ९९ | ७५ |
| १५. | विणकर संस्था | ५५ | ५३ | २३ | ६७ |
| १६. | इतर औद्योगिक संस्था | १३३ | १२५ | १४५ | १३३ |
| १७. | साखर कारखाने | १२ | १२ | १२ | १२ |
| १८. | सूत गिरण्या | ३ | २१ | २१ | १८ |
| १९. | जिल्हा सहकारी बोर्ड | १ | १ | १ | १ |
| २०. | इतर संस्था | ७० | १२४ | १३७ | ३१९ |
| | एकूण संस्था | २७९९ | ३२६० | ३९४४ | ४८०४ |

संदर्भ : कोल्हापूर जिल्हातील सहकारी संस्था सांख्यिकी माहिती पुस्तिकेवरून.

वरील तक्ता क्र. १ वरून कोल्हापूर जिल्हातील सहकारी चळवळी-मध्ये वाढ कशी होत गेली ते समजून येते.

१) शेतकी सेवा संस्थांच्या आकडेवारीकडे पाहिले असता असे आढळून येते की, १९७८ ते १९८१ या कालखंडामध्ये ०.९८ टक्क्यांनी या संस्थामध्ये घट घडून आलेली आढळते. मात्र १९८१ ते १९८९ या कालावधीत १.८९ टक्क्यांनी या संस्थांच्या संख्येमध्ये वाढ घडून आल्याचे दिसते.

२) नागरी पत व मिश्री संस्थांमध्ये १९७८ ते १९८१ या कालावधीत ४६.७९ टक्क्यांनी वाढ झाली आहे. तसेच १९८१ ते १९८५ या कालखंडातही या संस्थांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आढळते. त्यानंतर १९८५ ते ८९ या कालावधीत ही वाढ ९७.४६ टक्क्यांनी झालेली दिसते या कालावधीतील ही संख्या वाढण्याची प्रगती फारच समाधानकारक आहे असे आढळते.

३) दुग्ध पुरवठा संस्थांच्या आकडेवारी पाहिले असता असे आढळून येते की १९७८ ते १९८१ या कालखंडात या संस्थांच्या संख्येमध्ये २७.४९ टक्क्यांनी वाढ झाली आहे. तसेच १९८१ ते १९८५ या कालखंडात ही वाढ ४०.८२ टक्के इतकी झालेली दिसते. मात्र १९८५ ते १९८९ या कालावधीत ही वाढ अत्यल्प प्रमाणात झालेली दिसते.

४) १९७८ ते १९८९ या कालखंडात पाणी पुरवठा संस्था, घर-बांधणी संस्था व सूत गिरण्या या संस्थांमध्ये सुरुवातीच्या कालावधीत वाढ घडून आल्याचे आढळते पण नंतर या संस्थांच्या संख्येमध्ये घट होत गेलेली आढळते.

५) १९७८ ते १९८९ या कालखंडात अर्बन बँका, मार्केटिंग सहकारी संस्था व शेतीमाल प्रक्रिया संस्था या संस्थामध्ये फारच थोडया प्रमाणात वाढ घडून आल्याचे आढळते.

६) धान्य सहकारी बँका, शेती संस्था, मजूर संस्था व इतर औद्योगिक संस्थांच्या संख्येमध्ये घट धरून आल्याचे आढळते.

## १.३ शेतकरी सहकारी संघाची सहकारी चळवळीच्या विकासातील भूमिका :

आमचा अभ्यास विषय खत कारखाना असला तरी तो शेतकरी संघाची शाखा असल्याने शेतकरी संघाची विकासातील भूमिका पाहणे आवश्यक आहे. सन १९३० ते १९४० सालात सर्व जगभर आर्थिक मंदीची लाट पसरली होती. शेतीचा माल कमी भावाने विकला जात होता. अडते व दलालांच्या व्यापारी पध्दतीमुळे शेतकरी वर्ग अक्षरश: पिळून निघत होता. या सुमारास हिंदुस्थानात राजकिय वातावरणही तापत चालले होते. या सर्व गोष्टींचा परिणाम म्हणून कोल्हापूर संस्थानात कै. माधवराव बागल व देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार यांच्या नेतृत्वाखाली प्रजा परिषदेची चळवळ जोमात सुरू होती. शेतकरी वर्गाला त्यावेळी राजकिय भवितव्यापेक्षा आपल्या मालाची विल्हेवाट कशी होते याबद्दलच मुख्यत्वे चिंता वाटत होती. म्हणून शेतकऱ्यांच्या तात्कालिक अडचणी निवारण करण्यासाठी व त्यांची अडते दलालांच्या तावडीतून सुटका करण्यासाठी खरेदी-विक्री संघाची स्थापना करण्याचा विचार चालू झाला. सर्वश्री पी.ए. राणे, एम्.एस्. तोडकर, डी.आर. भोसले, व्ही.टी. पाटील, मामासाहेब मिणचेकर, बापूसाहेब राजाज्ञा, अ.ग. जामसांडेकर, डी.एस्. माने, ग.गो. जाधव या नामवंत समाज कार्यकर्त्यांनी सहकारी खरेदी संघ स्थापण्याचा निश्चय केला व या नव्या संस्थेची धुरा प्रारंभी श्री. पी.ए. राणे व श्री. एम्.एस्. तोडकर यांनी वहावी असे ठरून २३ आक्टोबर, १९३९ रोजी विजया दशमीच्या शुभ मुहुर्तावर शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ लि., शाहुपूरी, कोल्हापूर या संस्थेची स्थापना करण्यात आली.

१.३.१ प्रारंभीचे भांडवल -

२५ रुपयांचा एक भाग (शेअर्स) या रूपाने दोन हजार रुपये जमवून कार्यास प्रारंभ केला गेला. २५ रुपयांपैकी प्रथमता १० रुपयांचा पहिला हप्ता म्हणून घेतले. १९३९ ते १९४३ या चार वर्षांच्या कालावधीत ११ हजार रुपयांचे शेअर भांडवल जमविण्यात आले. संघाच्या स्थापनेनंतर म्हणजे सन १९४० मध्ये ` अ ` वर्ग व्यक्ती सभासद २१३ व संस्था सभासद १७ होते. ` ब ` वर्ग सभासद कोणी नव्हते तसेच शेअर भांडवल रु. ४,५६४.०० व खेळते भांडवल रु. २५,५२२ इतके होते.

१.३.२ संघाची वाटचाल :

संघाचे अध्यक्ष श्री. पी.ए. राणे हे सरकारी नोकर होते व ते आपली नोकरी सांभाळून संघाचा कारभार पहात होते व श्री. तोडकर वकील हे आपला व्यवसाय पाहून मॅनेजिंग डायरेक्टरची कामगिरी बजावत होते. शेतकरी वर्गाच्या कल्याणासाठी आपला संपूर्ण वेळ संघाच्या कामी देणाऱ्या व्यापारी खाचा खोचा माहित असलेल्या व सहकारी तत्वावर अढळ निष्ठा असलेल्या व्यक्तींच्या हाती संस्थेची धुरा देण्याचा विचार श्री. राणे व श्री. तोडकर वकील यांनी केला. या विचारविनीमयामध्ये त्यावेळच्या इलाखा पंचायतीचे चीफ ऑफीसर श्री. डी.आर. भोसले यांनी संघाच्या मॅनेजिंग डायरेक्टरच्या जागेसाठी श्री. तात्यासाहेब मोहिते यांचे नाव सुचविले. तत्कालिन सहकारी खात्याचे रजिस्ट्रार राव. फातर्फेकर यांना तात्यासाहेबांच्या कार्यपध्दतीची व अविश्रांत परिश्रम करण्याच्या त्यांच्या मनोवृत्तीची चांगली कल्पना होती. त्यामुळे त्यांच्या नावास सहकार खात्याचीही मान्यता मिळाली. म्हणून श्री. पी.ए. राणे व श्री. तोडकर वकील यांनी यड्राव गावी जाऊन संघाची संपूर्ण जबाबदारी स्विकारण्यासाठी प्रवृत्त केले. तात्यासाहेब हे संघाचे सभासद असल्यामुळे संघाच्या कारभारावर सूक्ष्म नजर ठेवून होते. त्यामुळे संघाच्या तांत्रिक अडचणी त्यांना माहित होत्या.

त्यामुळे त्यांनी संघाची जबाबदारी दिनांक ३१-१०-१९४३ रोजी मोठ्या आनंदाने स्विकारली.

### १.३.४ सहकारी संघाची कार्यपध्दती :

दैनंदिन कामकाजाच्या बाबतीत प्रतिदिनी संघाचे प्रमुख कार्यालयात ऑफीस वेळेपूर्वी संघाचे सर्व कर्मचारी प्रार्थनागृहात एकत्रित जमतात यावेळी कर्मचाऱ्यांपैकी एक कर्मचारी सर्वसाधारणपणे सहकार व इतर पोषक विषयांवर भाषण करतो. या भाषणानंतर सामुहिक सहकार गीत म्हणण्यात येते. या कार्यक्रमात प्रमुख अधिकाऱ्यांपासून कनिष्ठ वर्गाच्या नोकरापर्यन्त सर्व कर्मचारी भाग घेतात. यामुळे संघाच्या कर्मचारी वर्गामध्ये सहकार्य, एकोपा व बंधुभाव आणि एकसंधीपणा संवर्धन होण्यास मदत होते. तसेच संघाच्या व्यवस्थापक मंडळाची महिन्यातून किमान एक सभा होते. तसेच प्रत्येक महिन्याच्या अकरा तारखेला व्यवस्थापक मंडळाची मासिक बैठक होते. संघाच्या कारभारासाठी निरनिराळे विभाग पाडण्यात आले आहेत. प्रत्येक विभागाचा वेगवेगळा मासिक आणि वार्षिक ताळेबंद असतो. या सर्व ताळेबंदाचे एकत्रिकरण संघाच्या मुख्य कार्यालयामध्ये करण्यात येते व नंतर संघाचा एकत्रित ताळेबंद तयार केला जातो. प्रत्येक विभागाला त्याची कीर्द, खाते, विक्री, रजिस्टर व स्टॉकबुक इत्यादी रजिस्टर ज्या त्या दिवशी लिहून पूर्ण करावी लागतात. कोल्हापूर शहरामध्ये असलेल्या निरनिराळ्या विभागांना आपल्या व्यवहाराचा दैनिक अहवाल रोज सायंकाळी पाच वाजण्यापूर्वी मुख्य कार्यालयाकडे पाठवावा लागतो. शहरा बाहेरच्या शाखांचा अहवाल पोस्टाने दुसऱ्या दिवशी मुख्य कार्यालयाकडे येतो. हे सर्व अहवाल संघाचे चिटणीस आपल्या शेऱ्यासह कार्यकारी संचालकाकडे पाठवितात. सर्व शाखा व विभागांना आपला मासिक अहवाल प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपूर्वी मुख्य कार्यालयाकडे पाठवावे लागतात. या

अहवालात ताळेबंद, नफा, तोटा इ. नोंद असते. हे अहवाल व संबंधित कागदपत्र मुख्य कार्यालयातील हिशोबी विभागाकडून तारीख ६ ते ९ पर्यन्त काळजीपूर्वक तपासले जातात आणि संघाचा एकत्रित ताळेबंद तयार केला हा जातो. हा ताळेबंद संघाच्या प्रत्येक महिन्याच्या ११ तारखेला भरणाऱ्या संचालक मंडळाच्या सभेच्या कामकाजाची नोंद २४ तासांचे आत लिहिली जाते.

१.३.५ <u>शेतकरी संघाचे व्यवस्थापन</u> :

संघामध्ये सुरुवातीपासून मनमिळाऊ चारित्र्यसंपन्न, कुशल व कर्तबगार अशा संचालकांची परंपरा लाभली आहे. कार्यकारी मंडळाचे ठराव व निर्णय एकमताने पास होतात. संघाच्या कार्यकारी मंडळाने संघाला पक्षीय राजकारणापासून अलिप्त ठेवले आहे. संघाने आजवर केलेल्या अव्याहत प्रगतीला ही गोष्ट अत्यंत पोषक ठरलेली आहे. त्याप्रमाणे संघाचे सभासद व नोकर यांचेशी अत्यंत जिव्हाळ्याचे व आपुलकीचे संबंध टिकवून ठेऊन आहेत.

शेतकरी सहकारी संघ सभासदांना व इतर ग्राहकांना शेतीमाल, विक्री, शेती उपयोगी व्यवसाय व ग्राहक व्यवसाय, प्रक्रिया इ. सेवा पुरवते.

शेतकरी सहकारी संघाच्या सध्या १०८ शाखा आहेत व ११०० कर्मचारी संघामध्ये नोकरी करतात. तसेच सध्या १९८९ पर्यन्त ` अ ` वर्ग व्यक्ती सभासद ४३,२४८ व संस्था सभासद १००१ इतके आहेत व ` ब ` वर्ग सभासद १०,८७३ इतके आहेत. त्याच बरोबर ५५,०५,८७५ इतके शेअर भांडवल व १४,६७,५७,४१४ इतके ठेवी भांडवल आहे.

शेतकरी संघाची प्रगती पुढील तक्ता क्रमांक दोन वरून समजून येते.

तक्ता क्रमांक १.२

शेतकरी सहकारी संघ लि., कोल्हापूर प्रगती पत्रक

| वर्ष | सभासद `अ` वर्ग व्यक्ती | सभासद `अ` वर्ग संस्था | `ब` वर्ग | शेअर भांडवल | खेळते भांडवल | डिव्हीडंड दर टक्के |
|---|---|---|---|---|---|---|
| १९३९-४० | २१३ | १७ | - | ४५६४ | २५५२२ | ४ |
| १९४४-४५ | १६९६ | ९९ | - | ६१५७२ | २५०९११ | $६\frac{१}{४}$ |
| १९४९-५० | २०२६ | १६४ | - | १५२९०० | १२६४४८७ | $६\frac{१}{४}$ |
| १९५४-५५ | ३२०६ | २६४ | ४०४९ | २५७६५० | १२९४९०९ | $६\frac{१}{४}$ |
| १९५९-६० | ४३९६ | ३३४ | ७३६६ | २८३५२५ | ७८००७८३ | $६\frac{१}{४}$ |
| १९६४-६५ | ५७७७ | ४७३ | ७४७५ | ४४६६५० | १४५४२७५१ | ९ |
| १९६९-७० | १४८८५ | ५७८ | ७५१७ | १८४७००० | ३०४०३००० | ९ |
| १९७४-७५ | २४९२३ | ६५६ | ७५९८ | २७२०७५० | ३७५४६९४३ | ९ |
| १९७९-८० | ४१५१८ | १००८ | ८४०३ | ३८०३७७५ | ६१८३७०८० | ९ + ३ |
| १९८४-८५ | ४१३९६ | १००५ | १०२१७ | ४५९९५७५ | ९०७०५३७५ | ९ + ३ |
| १९८५-८६ | ४१३५४ | १००२ | १०४०५ | ५०५३१०० | १००५७६८७० | १२ |
| १९८६-८७ | ४१३१४ | १००२ | १०६६० | ५१२७८०० | ११७४१७८६६ | १२ |
| १९८७-८८ | ४१२८४ | १००२ | १०७४९ | ५३८६६२५ | १५८१३७१०० | १२ |
| १९८८-८९ | ४१२४८ | १००१ | १०८७३ | ५५०५०७५ | १४६७५७४१४ | १२ |

संदर्भ : शेतकरी सहकारी संघ लि., कोल्हापूर वार्षिक अहवालवरून

## १.४ शेतकरी सहकारी संघाची शाखा - दाणेदार मिश्र खत कारखाना मर्यादित, रुकडी - सर्वसामान्य माहिती

### १.४.१ स्थापनेची कारणे :

२३ आक्टोबर, १९३९ ला कोल्हापूर मधील शाहुपूरी बाजार पेठेत शेतकरी सहकारी संघाची स्थापना करण्यात आली. या खरेदी-विक्री संघाचे सभासद हे प्रामुख्याने मोठया प्रमाणात खेड्यातील शेतकरी होते. शेतकऱ्यांची खरी गरज ही खते, बियाणे, औषधे, कर्ज व मालाची विक्री ही होती.

१९४० च्या दरम्यान शेंगदाण्याच्या पेंडीचा मोठया प्रमाणात खतासाठी वापर केला जाई. अमोनियम सल्फेटही थोड्या प्रमाणात वापरण्याची प्रथा होती. १९४३-४४ दरम्यानच्या काळामध्ये बाजारपेठेमध्ये पेंड व सल्फेटचे मोठे गैरव्यवहार होत होते. अशा काळात शेतकऱ्यांना त्यांची निकडीची खताची गरज पूर्ण करणे हे संघाचे कर्तव्य होते. यासाठी १९४७ साली कोल्हापूर दरबारकडून दहा वर्षे मुदतीने बिनव्याजी दहा हजार रुपये व रुकडी कॅपाजवळ पाच एकर जागा मिळवून संघाने हाडाचे खत त्यार करण्यासाठी बोनमिल फॅक्टरी उभारण्यात आली. परंतु हाडाच्या अपुऱ्या पुरवठयामुळे ही मिल चालू ठेवणे अशक्य झाले शेवटी शेतकऱ्यांना खताचा पुरवठा करण्यासाठी संघाने रुकडीमध्ये खत कारखाना स्थापण्याचा विचार केला. अशात-हेने रुकडी येथे सन १९६८ मध्ये दाणेदार मिश्र खत कारखाना सुरू केला. खत कारखान्यामध्ये उत्पादनाला प्रत्यक्षात सुरुवात १३ एप्रिल, १९६८ मध्ये झाली.

खत कारखाना हलकडीमध्ये स्थापण्याचे कारण म्हणजे खत कारखान्यासाठी जागा उपलब्ध झाली. तसेच रेल्वे वाहतूक सोय व हलकडी गाव हे कोल्हापूर सांगली या महामार्गावर असल्यामुळे वाहतूक सुलभ झाली. तसेच कारखाना हा जकात नाक्याच्या बाहेर आहे.

१.४.२ <u>विशेष बाब</u> :

शेतकरी सहकारी संघ लि., कोल्हापूर यांचा हलकडी येथील खत कारखाना देशातील पहिल्या सहकारी दाणेदार मिश्र खत कारखाना आहे.

खत कारखाना युनिट नंबर एक उभा करण्यासाठी रू. २१,८२,००० व युनिट नंबर दोन उभा करण्यासाठी रू. ३४,३५,०००.०० लागले आहेत.

युनिट नंबर एक व युनिट नंबर दोन अशी नावे कारखान्याने आपल्या सोयी साठी दिली आहेत. युनिट नंबर एक म्हणजे खत कारखान्यामध्ये सुरूवातीला खत उत्पादनासाठी एक मशिनरी बसविण्यात आली. त्यानंतर खताची वाढती मागणी विचारात घेऊन खताचे अधिक उत्पादन करण्यासाठी दुसरी मशिनरी बसविण्यात आली. यालाच युनिट नंबर दोन असे संबोधण्यात येते.

खत कारखान्यामध्ये १९८९ अखेर ११६ कर्मचारी काम करतात. कारखान्याचे उत्पादन दोन पाळीत चालते. ते म्हणजे सकाळी आठ ते दुपारी चार व दुपारी चार ते रात्री १२ या वेळेत चालते. सुरूवातीला जे कामगार कामावर घेतले ते अनुभवी नव्हते नंतर त्यातूनच अनुभवी कामगार तयार झाला.

१.४.३ <u>उत्पादन क्षमता</u> :

कारखान्याची दैनिक उत्पादन क्षमता युनिट नंबर एकची १०० मेट्रीक टन व युनिट नंबर दोनची १५० मेट्रीक टन अशी आहे. म्हणजे दिवसाची एकूण उत्पादन क्षमता २५० मेट्रीक टन आहे. कारखान्याची

महिन्याची उत्पादन क्षमता ६२५० मेट्रीक टन व वार्षिक उत्पादन क्षमता ७५००० मेट्रीक टन आहे. प्रत्यक्षात आता पर्यन्त म्हणजे १९८९ अखेर ४२००० मेट्रीक टन उत्पादन केले आहे. म्हणजे ५६ टक्के उत्पादन क्षमतेचा वापर झाला आहे.

१.४.४ खताचे उत्पादन :

खत कारखान्यामध्ये १५:५:५, १५:१५:१५, १८:१८:१०, १०:२०:२०, २०:१०:१०, २०:२०:० या उत्पादन ग्रेडची खते तयार होतात. खत उत्पादन करण्यासाठी प्रति टनाला ३६० रुपये खर्च येतो. यामध्ये कामगारांचा पगार, प्रॉव्हीडेंन्ट फंड, ओव्हर टाईम, बारदान छपाई, हमाली, लाईट, मेंटेनन्स, पाणी, इतर खर्च यांचा समावेश होतो.

सन १९६८-६९ मध्ये १६,६११ टन खताचे उत्पादन झाले त्यापैकी १५,४२३ टनांची विक्री झाली म्हणजे एकूण उत्पादनाच्या ९२.८५ टक्के विक्री झाली म्हणजे १००.४३ लाख रुपयांची विक्री झाली. त्याच्यामधून रु. ३,४८,८९६.०० नफा झाला. सध्या सन १९८८-८९ मध्ये ३८,१३१ टन खताचे उत्पादन झाले आहे व ३८,२७१ टन खताची विक्री केली आहे. म्हणजे एकूण उत्पादनाच्या १००.३६ टक्के विक्री झाली. त्याची विक्री किंमत ७०४.६८ लाख रुपये आहे. त्यातून रु. ३२,७८,६८६ नफा झाला आहे.

१.४.५ विक्री व्यवस्था :

खत कारखान्याच्या खताच्या मालकीच्या गोडावूनमध्ये ४५०० टन खताच्या साठयाची क्षमता आहे. खताची विक्री कारखान्यामार्फत न होता ती संघाच्या खत विभागामार्फत केली जाते. खताची विक्री संघाच्या केंद्र सोसायटया, तालुका खरेदी विक्री संघ, कृषी सेवा केंद्र व गाव पातळी-वरील शेतकी सेवा सोसायटया या घटकांद्वारे केली जाते. कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी, लातूर, नांदेड, बिड, उस्मानाबाद, पुणे, जालना, पंढरपूर, अकलूज, सोलापूर या ठिकाणी माल वाहतूक संघ स्वत:च्या

व इतर वाहतूक विभागामार्फत करते. याच्यासाठी किमान आठ टन मालाची ऑर्डर खत खरेदी करणाऱ्यांनी दिली पाहिजे.

संघाकडून खालील संस्थांना पुढीलप्रमाणे कमिशन दिले जाते :

१) तालुका संघ व जिल्हा पातळीवरील संघ टनाला ३५ रुपये.

२) सहकारी संस्था, कृषी सेवा केंद्र टनाला २५ रुपये.

३) व्यक्ती सभासद टनाला २० रुपये.

४) इतर भागासाठी कॅश रिबेट टनाला ४० रुपये दिला जातो. चेक दिला तर २५ रुपये दिले जाते व वाहतूक म्हणून ५० रुपये सवलत दिली जाते.

१.४.६ कच्चा माल :

दाणेदार मिश्र खत तयार करण्यासाठी अमोनियम सल्फेट, युरिया, डायअमोनियम फॉस्फेट, सुपर फॉस्फेट, डोलोमाईट पावडर, पोटॅश इ. कच्चा माल लागतो. हा कच्चा माल राष्ट्रीय केमिकल्स ॲन्ड फर्टिलायझर्स लि., हु झुआरी ॲग्रो केमिकल्स लि., गुजरात स्टेट फर्टिलायझर्स स्पिक लि., रामा कृष्णी रसायन लि., पुणे, आदर्श केमिकल्स ॲन्ड फर्टिलायझर्स लि., उधना, भारत फर्टिलायझर लि., मुंबई या कंपन्याकडून पुरवठा केला जातो.

एकंदरीत पाहता दाणेदार मिश्र खताला वाढती मागणी असल्यामुळे खत कारखाना खत उत्पादन अधिक करण्याचा प्रयत्न करीत आहे.

१.४.७ मूल्यमापन :

या प्रकरणात प्रथम कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी चळवळीचा उदय व विकास याची थोडक्यात माहिती दिली आहे. तक्ता क्र. १.१ पाहिल्यास कोल्हापूरातील सहकारीची चळवळीची दिशा तसेच प्रगतीची

वाटचाल लक्षात येते. त्यानंतर कोल्हापूरातील अग्रणी असलेली संस्था म्हणून ` शेतकरी सहकारी संघ मर्यादित, कोल्हापूर ` यांची सहकारी चळवळीच्या विकासातील भूमिका स्पष्ट केली. यात संघाची वाटचाल, कार्यपध्दती, व्यवस्थापन आदी बाबींचा समावेश आहे. आपला अभ्यास-विषय म्हणून जी संस्था महत्वाची आहे त्या ` दाणेदार मिश्र खत कारखाना मर्यादित, इचलकरंजी ` या संस्थेची सर्वसामान्य माहिती दिली आहे. यात स्थापना, स्थापनेची कारणे, उत्पादन क्षमता, खताच्या विविध श्रेणी, विक्री व्यवस्था, कच्चा माल या विषयी थोडक्यात उहापोह केला आहे. याला ऐतिहासिक पार्श्वभूमी असे म्हणता येईल. या प्रकरणात जो अभ्यास करावयाचा आहे त्याची वैचारिक बैठक थोडक्यात वरीलप्रमाणे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. यात खत कारखान्याची सर्वसाधारण माहिती समाविष्ट केली आहे.